तरुण भारत संवाद
शनिवार, २० सप्टेंबर २०



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित महापालिका स्तरावरील वुशू स्पर्धेचे उद्घाटनप्रसंगी पंच व मान्यवर.

# विवेकानंद कॉलेजमध्ये मनपास्तरीय वुशू स्पर्धा

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कोल्हापूर व विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने विवेकानंदमध्ये वुशू स्पर्धा झाल्यां. या स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते झाले.

कोल्हापूर महानगरपालिका क्रीडा निरीक्षक सचिन पांडव यांनी प्रास्ताविक केले. कोल्हापूर वुशू असोशिएशनचे अध्यक्ष अविनाश पाटील, डॉ. महेश कदम, लहू अंगज पंच व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कोल्हापूर शहरातील जवळपासस ११० विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. या स्पर्धा १४ वर्षाखालील, १७ वर्षाखालील व १९ वर्षाखालील मुले व मुली सहभागी होते. स्पर्धेचे नियोजन प्रा. संतोष कुंडले, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. समीर पठाण, प्रा. साद मुजावर, सुरेश चरापले यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संतोष कुंडले यांनी केले. आभार प्रा. साद मुजावर यांनी मानले.

तरुण भारत

शनिवार, २० सप्टेंबर २०२५

# विवेकानंदमध्ये व्याख्यान

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयात 'करिअर अपॉच्युनिटीज इन मायक्रोबायोलॉजी' या विषयावर ऑनलाइन व्याख्यान झाले. डॉ. व्ही. एस. पाटील यांनी नोकरीच्या संधीबद्दल मार्गदर्शन केले. शिक्षण, संशोधन, फार्मास्युटिकल, इंडस्टीयल क्षेत्रात असलेल्या संधी यासंदर्भात मार्गदर्शन केले. प्रा. व्ही. व्ही. मिसाळ यांनी प्रास्ताविक केले. आभार डॉ. के. के. भिसे यांनी मानले.

पुण्य नगरी
शनिवार, २० सप्टेंबर २०२५

# विवेकानंद कॉलेजमध्ये इनक्युबेशन प्लेसमेंट ड्राईव्ह

**कोल्हापूर :** महाविद्यालयाच्या इनक्युबेशन प्लेसमेंट ड्राईव्हतर्फे बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स, बी.सी.एस. व बी.सी.ए.च्या अंतिम वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती क्सूय स्पायडर्स कंपनीच्या अधिकाऱ्यांनी घेतल्या. या कंपनीमध्ये विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी ॲप्टिट्यूट टेस्ट, ग्रुप डिस्कशन, व वैयक्तिक मुलाखती घेतल्या. यामधून ४० विद्यार्थ्यांची पुणे येथे होणाऱ्या मोफत प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर या विद्यार्थ्यांना विविध नामंकित कंपन्यांमध्ये चांगल्या नोकरीची संधी उपलब्ध होणार आहे.

**मोफत प्रशिक्षणासाठी ४० विद्यार्थ्यांची निवड**

या विद्यार्थ्यांना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, अंतर्गत मूल्यमापन हमी कक्षच्या डॉ. श्रुती जोशी, प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. सतीश चव्हाण, डॉ. संजय लठ्ठे, प्रा. संजय थोरात, डॉ. राजश्री पाटील, डॉ. अस्मिता तपासे, प्रा. पल्लवी देसाई, प्रा. विजय पुजारी, डॉ. आशुतोष उपाध्ये, डॉ. अभिजित कासारकर, प्रा. वृषाली मिसाळ, प्रबंधक सचिन धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ
कोल्हापूर, शनिवार, २० सप्टेंबर २०२५

# प्रा. सुप्रिया पाटील यांना इंग्रजीत पीएच.डी.



प्रा. सुप्रिया पाटील

कंदलगाव : विवेकानंद कॉलेज, (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथील प्रा. सुप्रिया मोहन पाटील यांना शिवाजी विद्यापीठाने इंग्रजी विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केली. त्यांच्या 'फॉर्म ॲंज स्टेटमेंट: ए स्टडी ऑफ नॅरेटीव्ह स्ट्रक्चर्स ॲंड स्ट्रॅटेजिज इन अनिता नायर्स सिलेक्टेड नॉव्हेल्स' या प्रबंधास पीएच. डी. ही पदवी प्रदान केली. त्यांना प्रा. डॉ. तृप्ती करेकट्टी यांचे मार्गदर्शन, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. श्रुती जोशी, डॉ. कविता तिवडे, वडील मोहन पाटील, आई आशालता पाटील, मिथिलेश पाटील यांचे सहकार्य लाभले. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, शुभांगी गावडे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन मिळाले.

बातम्यांचा राजा
दैनिक जनप्रवास
सांगली | शनिवार दि. २० सप्टेंबर २०२५



मिरजेतील युवा महोत्सवात आपली कला सादर करताना महाविद्यालयीन युवक.

# युवा महोत्सवाच्या माध्यमातून तरुणाईचा जल्लोष

**जनप्रवास | मिरज**

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या ४५ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या माध्यमातून महाविद्यालयीन तरुणांचा विविध कलांद्वारे जल्लोष सुरू आहे. विद्यार्थी विविध स्पर्धांमध्ये अत्यंत पूर्वतयारीने उतरून आपल्या कला मोठ्या उत्साहात सादर करत आहेत.

पाच प्रकारातील ३६ स्पर्धा या तीन दिवसांमध्ये होत आहेत. आज पाश्चिमात्य समूहगीत, भारतीय समूहगीत, लोकनृत्य, मूकनाट्य एकांकिका, पाश्चिमात्य एकल गायन, पाश्चिमात्य एकल वादन, सुगम गायन, शास्त्रीय तालवाद्य, शास्त्रीय गायन, स्थळचित्रण, स्थळ छायाचित्रण, सांघिक रचनाकृती, कातरकाम, मेहंदी रचना, रांगोळी या सर्व स्पर्धांमध्ये विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला व एका पेक्षा एक दर्जेदार कलाकृती सादर केल्या. लोकनाट्य व एकांकिका बालगंधर्व नाट्यगृहामध्ये झाल्या तर इतर स्पर्धा महाविद्यालयाची ग्रंथालय अभ्यासिका सभागृह व महाविद्यालय परिसरामध्ये पार पडल्या.

पुढारी MY कोल्हापूर शनिवार, २० सप्टेंबर २०२५

# 'विवेकानंद'मधील व्याख्यानास प्रतिसाद

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयात सूक्ष्मजीवशास्त्र व बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या वतीने करिअर अपॉर्च्युनिटीज इन मायक्रोबायोलॉजी या विषयावर ऑनलाईन व्याख्यान झाले. एल.बी.एस. कॉलेज सातारा येथील सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. व्ही. एस. पाटील यांनी बी. एस्सी व एम. एस्सी नंतर विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या नोकरीच्या संधीची माहिती दिली. प्रा. व्ही. व्ही. मिसाळ यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रा. डॉ. के. के. भिसे यांनी आभार मानले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, विभागप्रमुख डॉ. टी. सी. गौपाले यांचे मार्गदर्शन मिळाले.

24

पुण्य नगरी

शनिवार, २० सप्टेंबर २०२५

# एमपीएससीत 'ईडब्ल्यूएस'मध्ये साक्षी कागले राज्यात पहिली

हुपरी : तळंदगे, ता. हातकणंगले येथील साक्षी कागले हिने खडतर परिश्रम व जिद्द यांच्या जोरावर एमपीएससी परीक्षेमध्ये ईडब्ल्यूएस महिला प्रवर्गातून राज्यात पहिला क्रमांक पटकावला. तिची राज्य कर निरीक्षकपदी, तसेच सहायक विभाग अधिकारी मंत्रालय मुंबई या पदावर नियुक्ती केली आहे.



मध्यमवर्गीय कुटुंबातील साक्षीचे प्राथमिक शिक्षण कुमार विद्यामंदिर तळंदगे, उच्च माध्यमिक शिक्षण विवेकानंद कॉलेज येथे झाले. राजाराम महाविद्यालय येथून गणित विषयात पदवी घेतल्यानंतर दोन वर्षांपासून पुणे येथे लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी अभ्यास केला. पहिल्या प्रयत्नात तिने यश मिळवले. सध्या वर्ग एक पदासाठी अभ्यासाची तयारी सुरू आहे. आई संगीता कागले आणि खासगी कंपनीत काम करत असलेले वडील सुनील कागले यांचे प्रोत्साहन लाभल्याचे साक्षीने आवर्जून सांगितले.

पुण्य नगरी
। शनिवार, २० सप्टेंबर २०२५

# वुशू स्पर्धेमध्ये 'स. म. लोहिया'चे यश

**कोल्हापूर :** जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद कोल्हापूर यांच्या वतीने विवेकानंद कॉलेज येथे घेण्यात आलेल्या शालेय वुशू स्पर्धेमध्ये सौ. स. म. लोहिया ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. यामध्ये १७ वर्षांखालील मुलांच्या ७० किलो वजन गटामध्ये कॉलेजचा खेळाडू पुरुषोत्तम प्रकाश पाटील याने सुवर्ण, तर आयुष सर्जेराव पाटील ५० ते ५५ किलो वजन गटामध्ये कास्यपदक मिळवले. यामधील पुरुषोत्तम पाटील याची विभागीय वुशू स्पर्धेसाठी निवड झाली आहे. दोन्ही खेळाडूंना दि न्यू एज्युकेशन सोसायटी कोल्हापूरचे गव्हर्निंग कौन्सिल सल्लागार विनोदकुमार लोहिया, अध्यक्ष निर्मलकुमार लोहिया, उपाध्यक्ष नितीन वाडीकर, दि न्यू एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी प्रभाकर हेरवाडे, एस. एस. चव्हाण, मुख्याध्यापिका एस. बी. पाटील, उपप्राचार्य जी. पी. नानिवडेकर, क्रीडाशिक्षक सचिन पुजारी यांचे मार्गदर्शन लाभले.